UNIVERSITY OF CAMBRIDGE INTERNATIONAL EXAMINATIONS
General Certificate of Education Advanced Level

**MARATHI** **9688/04**

Paper 4 Texts **October/November 2008**

**2 hours 30 minutes**

Additional Materials: Answer Booklet/Paper

**READ THESE INSTRUCTIONS FIRST**

If you have been given an Answer Booklet, follow the instructions on the front cover of the Booklet.
Write your Centre number, candidate number and name on all the work you hand in.
Write in dark blue or black pen.
Do not use staples, paper clips, highlighters, glue or correction fluid.

Answer any **three** questions, each on a different text. You must choose one question from Section 1, one from Section 2 and one other.
Write your answers in **Marathi** on the separate Answer Paper provided.
Dictionaries are **not** permitted.
You should write between 500 and 600 words for each answer.
Set texts may **not** be taken into the examination room.
You are advised to divide your time equally between your answers.

At the end of the examination, fasten all your work securely together.
All questions in this paper carry equal marks.

**सर्व प्रथम खालील सूचना वाचा.**

तुम्हाला उत्तरपुस्तिका दिली असल्यास तिच्या मुखपृष्ठावरील सूचनांचे पालन करा.
उत्तरपुस्तिका व पूरक उत्तरपृष्ठांवर तुमचा परीक्षा केंद्र क्रमांक, अनुक्रमांक (रोल नंबर) व तुमचे नाव लिहा.
गडद निळ्या अथवा काळ्या शाईच्या लेखणीने लिहावे.
टाचणी अथवा टाचण्याची कोणतीही अन्य साधने, वाक्यांना अधोरेखित करण्यासाठी रंगीत लेखणीचा वापर, डिंक किंवा चूक मजकूर खोडण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या शाईचा वापर करू नये.

कोणतेही **तीन** प्रश्न सोडवा. प्रत्येक प्रश्न हा वेगवेगळ्या पाठ्यपुस्तकांवर आधारीत असावा. विभाग 1 मधून **एक** प्रश्न, विभाग 2 मधून **एक** प्रश्न व उरलेला **एक** प्रश्न कोणत्याही विभागातून सोडवा.
उत्तर लिहिण्यासाठी देण्यात आलेल्या वेगळ्या पृष्ठांवर प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.
शब्दकोषांचा उपयोग करण्यास मनाई आहे.
प्रत्येक उत्तर 500 ते 600 शब्दांच्या मर्यादेत असावे.
प्रस्तावना, संदर्भ, टीपा व अर्थाचे स्पष्टीकरण असलेले पाठ्यपुस्तक परीक्षेच्या खोलीत नेता येणार नाही.
सर्व उत्तरांना समान वेळ द्यावा.

परीक्षेच्या शेवटी उत्तरांची सर्व पृष्ठे व्यवस्थित बांधावीत.
सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

This document consists of **5** printed pages and **3** blank pages.

SP (SC/TL) T45990/2
© UCLES 2008
UNIVERSITY *of* CAMBRIDGE International Examinations

[Turn over

www.xtremepapers.net

## विभाग-1

**1 संत ज्ञानेश्वर -सार्थ ज्ञानेश्वरी - अध्याय 2 रा.**

**(ओवी क्रमांक ५७ ते ६२)**

देवा मज तैसें जाहलें । जें मन हें भ्रांती ग्रासिलें।
आतां काय हित आपुलें । तैंही नेणे ॥
तरी श्रीकृष्णा तुवां जाणावें । निकें तें आम्हां सांगावें ।
जे सखा सर्वस्व आघवें । आम्हांसि तूं ॥
तूं गुरु बंधु पिता । तू आमची इष्ट देवता ।
तूंचि सदा रक्षिता । आपदीं आमुतें ॥
जैसा शिष्यांते गुरु । सर्वथा नेणे अव्हेरु ।
कीं सरितांतें सागरु । त्यजी केवीं ॥
नातरी अपत्यातें माये । सांडूनि जरी जाये ।
तरी तें कैसेनि जिये । ऐकें कृष्णा ॥
तैसा सर्वांपरी आम्हांसि । देवा तूंचि एक आहासि ।
आणि बोलिलें जरी न मानिसी । मागील माझें ॥

**(अ)** **(i)** श्रीकृष्णाचे मोठेपण अर्जूनाने कोणत्या शब्दात वर्णन केले ते विशद करा.

**(ii)** 'आणि बोलिलें जरी न मानिसी मागील माझें ' अर्जून श्रीकृष्णापाशी काय बोलला ते सविस्तरपणे लिहा.

**(iii)** युद्धाच्या प्रसंगी काय उचित आणि काय अनुचित हे श्रीकृष्णाने सांगावे असे अर्जूनाला का वाटले? [25]

**अथवा**

**(ब)** युद्ध करण्यासाठी अर्जुनाचे मन वळवितांना श्रीकृष्णाने कोणता युक्तीवाद केला ते विशद करा. [25]



www.xtremepapers.net

**2** **संत तुकाराम-सार्थ श्री तुकारामाची गाथा.**

**(अभंग क्र.२७००, २७०१ व २७०२)**

ऐसे कोण पाप बळी । जें जवळी येऊं नेदी ॥
तुम्हा तवं होईल ठावें । नेदावें कां कळों हें ॥
कोण झाला अंतराय । कां ते पाय अंतरले ॥
तुका म्हणे निमित्याचा । आला सुचा अनुभव ॥

ब्रह्मज्ञान भरोवरी । सांगे आपण न करी ॥
थू थू त्याच्या तोंडावरी । व्यर्थ शिणविली वैखरी ॥
कथा करी वरिवरी । प्रेम नसेचि अंतरी ॥
तुका म्हणे कवित्व करी । मान लोभ हे अंतरी ॥

दगडाच्या देवा बगाडी नवस। बाईल कथेसी जाऊं ने दी ॥
वेंची धनरासी बांधिले स्मशान । दारी वृंदावन द्वाड मानी ॥
चोरे नागविला न करी त्याची खंती । परि द्विजा हाती नेदी रुका ॥
करी पाहुणेर व्याह्याजांवयासी /आल्या अतितासी पाठमोरा ॥
तुका म्हणे जळो धिग त्याचें जिणें /भार वाही सीण धरातळीं ॥

**(अ)** **(i)** परमेश्वराच्या भेटीची ओढ तुकारामाने कशी व्यक्त केली ते सांगा.

**(ii)** ढोंगी माणसांचा तुकारामाला राग का येतो ? तो त्याने कसा व कुठे कुठे व्यक्त केला आहे ते अभ्यासिलेल्या अभंगांच्या आधारे सांगा. [25]

**अथवा**

**(ब)** तुम्ही अभ्यासिलेल्या अंभगांच्या आधारे तत्कालीन सामाजिक परिस्थितीवर प्रकाश टाका. [25]

© UCLES 2008


www.xtremepapers.net

3 **गोविंदाग्रज-फणासाचे पान-कविता-फुले वेचिली पण.**

**(कडवी क्रमांक ६, ७ व ८)**

“काट्यापरि या कोमल हृदया टाकुनि देवा क्रूर
कुठे फुलांची धनीन माझी दिली दवडुनी दूर ?
कृतकर्माची फळे भोगणे अवश्य जीवा जगि या
गुदस्त ते गुलदस्त, नको ते पुनः पुन्हा मनि याया.”

अभंग निश्चय अशा प्रकारे कितिकदा जरि केला
या पुष्पांसम मृदुहि कारणे दुभंगति परि त्याला
वृत्ति बावरी झालि, आतल्या आत बिचारी रडली.
जीवाची नयनातुनि पुष्पे त्या पुष्पावरि पडली.

जीव जाहला जड; ती हाती पुष्पेही जड झाली
“फुले वेचिली पण-पण आता देतो टाकुनि खाली
चिरंमृताला हवा कशाला हा असला हव्यास ?
जिवंत फुलवंतीचा असला दुःखप्रद सहवास.

(अ) (i) पन्हाळगडावर कवीला कोणते दृष्य दिसले ? ते दृष्य पाहून त्याच्या मनात कोणता भाव जागृत झाला ?

(ii) ‘फुले वेचिली पण-पण आता देतो टाकुनि खाली’ असे कवी का म्हणतो ?

(iii) कवीचे एकाकीपणाचे व निष्प्रेमाचे दुःख या कवितेतून जागोजागी कसे व्यक्त झाले आहे ते स्पष्ट करा. [25]

**अथवा**

(ब) ‘एखाद्याचे नशिब’ या कवितेचा आशय व कल्पना सौंदर्य यावर प्रकाश टाका. [25]

© UCLES 2008


www.xtremepapers.net

## विभाग-2

**4** **अशोक पाटोळे-नाटक-आई रिटायर होतेय.**

(अ) नेत्रा आणि वीणा यांच्या स्वभावाची वैशिष्ट्ये सांगून त्यांची तुलना करा. [25]

**अथवा**

(ब) प्रस्तुत नाटकातील संघर्षाचे स्वरुप स्पष्ट करा. [25]

**5** **आशा बगे-कथासंग्रह-मारवा.**

(अ) परंपरेने चालत आलेल्या वहिवाटीत नवीन पिढीने बदल केल्यास जुन्या पिढीतील मंडळी त्यांच्याशी सहसा सहमत होत नाहीत हे लेखिकेने 'मारवा' कथेतून कसे सांगितले आहे ते समजाऊन सांगा. [25]

**अथवा**

(ब) 'घरटं' या कथेचा आशय स्पष्ट करा. [25]

**6** **गो.नि.दांडेकर-कांदबरी-पडघवली.**

(अ) 'पडघवली' ही प्रादेशिक कांदबरी की दीर्घ कथा ? सविस्तर चर्चा करा. [25]

**अथवा**

(ब) 'पडघवली' कांदबरीतील तुम्हाला आवडलेल्या कोणत्याही एका प्रसंगाचे सविस्तर निवेदन करा. [25]

© UCLES 2008


www.xtremepapers.net

BLANK PAGE



www.xtremepapers.net

BLANK PAGE



www.xtremepapers.net

**BLANK PAGE**

Permission to reproduce items where third-party owned material protected by copyright is included has been sought and cleared where possible. Every reasonable effort has been made by the publisher (UCLES) to trace copyright holders, but if any items requiring clearance have unwittingly been included, the publisher will be pleased to make amends at the earliest possible opportunity.

University of Cambridge International Examinations is part of the Cambridge Assessment Group. Cambridge Assessment is the brand name of University of Cambridge Local Examinations Syndicate (UCLES), which is itself a department of the University of Cambridge.



www.xtremepapers.net